७

**उपविभागीय अधिकारी माजलगाव यांजकडून**
**भुमी संपादन पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पादर्शकतेचा हक्क अधिनियम,२०१३ चे कलम १९(१) नुसार अधिसुचना**

दिनांक **२४.०६.२०२४**

**क्र.२४/एलएनक्यु/एसआर/४.९०.–** ज्याअर्थी, समोचित शासन असलेल्या बीड जिल्हयाच्या जिल्हाधिकारी यास भूमि संपादन, पुनर्वसन व पुर्नवसाहत करताना उचित भरपाइ्र मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम-२०१३ (२०१३ चा ३०) (यात यापूढे ज्याचा निर्देश उक्त अधिनियम असा केला आहे) याच्या कलम-११ च्या पोट कलम-(१) व्दारे प्रदर करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून काढण्यात आलेली अधिसूचना, महसूल व वन विभाग क्र.संकीर्ण-११/२०१४/प्र.क्र.७७/अ-२ दिनांक **१९ जानेवारी २०१५** अन्वये प्रारंभिक आधिसूचना काढण्यात आलेली आहे. आणि त्याव्दारे असे अधिसूचित केले आहे की यासोबत जोडलेल्या अनुसुचि-१ मध्ये अधिक तपशिलवार वर्ण केलेल्या जमीनीचा, अनुसूची दोन मध्ये अधिक तपशिलवार विनिर्दिष्ठ केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यक आहे किंवा तीची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे.

आणि ज्या अर्थी बीड जिल्हयाच्या जिल्हाधिका-याचे कलम-१५ च्या पोट कलम-२ अन्वये दिलेला अहवाल कोणताही असल्यास विचारात घेतल्यानंतर उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन संपादित करण्याची आवश्यकता आहे. याबाबत खात्री पटली आहे. आणि म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम-१९ पोटकलम-१ च्या तरतुदी अन्वये उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीनीची आवश्यकता आहे. असे याव्दारे घोषित करण्यात येत आहे. आणि ज्याअर्थी अनुसूची-३ मध्ये अधिक तपशिल वर्णन केलेले क्षेत्र हे बाधिक कुटूंबीयांच्या पूनर्वसन व पुर्नवसाहतीच्या प्रयोजनासाठी पुर्नवसाहत क्षेत्र म्हणून निर्धारित केले असल्याचे याव्दारे घोषित केले असून पुनर्वसन व पुर्नवसाहत योजनेचा सारांश अनुसूची-४ मध्ये विनिर्दीष्ठ केले आहे.

आणि ज्या अर्थी उक्त अधिनियमाच्या कलम-३ च्या खंड-(छ) अन्वये समोचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिका-याचे कार्य पार पाडण्यासाठी उपविभागीय अधिकारी माजलगांव यास पदनिर्देशित करत आहे.

**परिशिष्ट १**

**जमिनीचे वर्णन**

**गावाचे नांव :- सादोळा तालुका :- माजलगांवजिल्हा:- बीड**

| **अ. क्र.** | **गट नं. / सर्व्हे नं.** | **क्षेत्र हे. आर** |
|---|---|---|
| १. | १५५ | ०.०१ |
| २. | १५६ | १.०७ |
| ३. | १५७ | ०.३७ |
| ४. | १६८ | ०.०५ |
| ५. | १८४ | १.६० |
| ६. | १८३ | ०.५८ |
| ७. | १८२ | ०.९१ |
| ८. | १८९ | ०.३० |
| ९. | १८३ | ०.०१ |
| | **एकूण** | **४.९०** |

**अनुसूची-दोन**

**सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण**

प्रकल्पाचे नावः- माजलगांव उपसा योजना (लोणी सांगवी)

प्रकल्पाच्या कामाचे वर्णनः- माजलगांव उपसा योजना (लोणी सांगवी)

सामाजिक फायदेः- शेती पिकासाठी पाणी व जनावरांना पाणी इतर सार्वजनिक हितार्थ

**अनुसूची-तीन**

**पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन**

**गावाचे नांव :- सादोळा तालुका:- माजलगांव जिल्हा:- बीड**

| अ.क्र. | स.नं./ग.नं. | क्षेत्र (हे.आर.) |
|---|---|---|

लागू नाही.

**अनुसूची-चार**

(पुनर्वसन व पुर्नवसाहत योजनेचा सारांश)

(सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करणा-या अभिकरणाने दिलेला सामाजिक प्रभाव निर्धारण सारांश)

दिनांक १३ मार्च २०१५ चे राजपत्रात प्रसिध्द महाराष्ट्र शासनाचे अधिसूचना क्रमांक संकिर्ण ०१/२०१५/प्र.क्र.३/अ-२ नुसार उक्त अधिनियमाचे कलम-१० क नुसार सामाजिक प्रभाव निर्धारणाच्या तरतुदी लागू करण्यापासून सुट देण्यात आलेली आहे.

टिपः- उक्त जमीनीच्या नकाशाचे उपविभागीय अधिकारी माजलगांव याच्या कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.

दिनांक : .११.२०२४

ठिकाण : माजलगाव

उपविभागीय अधिकारी
माजलगाव.